ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 11 | JULY - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# भारतीय आरक्षणाचा इतिहास व आजची परीस्थिती

डॉ.राम फुन्ने
प्राचार्य, स्व.नितिन कला व विज्ञान महाविद्यालय,पाथरी.

## प्रस्तावना :



महाराष्ट्र आज आरक्षणाच्या आंदोलनामुळे ढवळुन निघाला आहे. विविध समाज घटकांकडुन वेगवेगळया सूचित किंवा वेगळया आरक्षणाची मागणी होत आहे. आरक्षणासाठी सुरू केलेल्या आंदोलनास प्रचंड प्रतिसाद मिळत असल्याने आरक्षण हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला.मग आरक्षणाचे धोरण केवळ जातीजमातीं पुरते न ठेवता आर्थिकदृष्टया़ जे मागास असतील त्यांच्यासाठी ठेवावयास हवे,असे मत देखील काही व्यक्तींकडुन मांडले गेले. 2014 मध्ये कॉग्रेसचे महासचीव जर्नाधन त्रीवेदी देखील म्हणाले होत की,आरक्षण जाती आधारीत न ठेवता ते आर्थिक निषकर्षावर असावे.आज या दृष्टीने विचार करण्याची आवश्यक्ता आहे. कारण आजचा प्रश्न गरीबी व आर्थिक परीस्थीतीचा आहे,गरीबीची कोणतीही जात वा धर्म नसतो तसेच दुर्बल घटकांच्या विकासासाठी आरक्षणाशीवाय इतर पर्याय देखील शोधण्याची आवश्यक्ता आहे.त्यावर खुप खलबते झााली.मागच्या काही दिवसात आरक्षणाचा प्रश्न प्रक्रशाने जानवत आहे.गुजरात मधील पाटीदार समाजाचे आरक्षणासाठीच्या आंदोलनाने देखील देश ढवळुन निघाला होता,महाराष्ट्रात देखील मागील काळात मराठा समाजाला आरक्षण देण्याची घोषणा करण्यात आली होती परंतु ते न्यायालयात टिकले नाही,यामागे त्यावेळच्या सरकारची राजकीय भुमिका इच्छा शक्तीचा अभाव हे देखील कारण आहे. या कारणाने आरक्षणाचा प्रश्न सुटु शकलेला नाही.सध्या सत्तेवर आसलेल्या भजपा सरकारची भुमिका देखील दुटप्पी असल्याचे जानवते.त्यातच राजस्थानातील वसुंधरा राजे यांच्या सरकारने आर्थिक मागासांना १४ टक्के जागा राखीव ठेवण्याची घोषणा केली. परिणामी केंद्रात सत्तेवर असलेल्या भाजपला तीन राज्यांत स्वतंत्र भूमिका घेण्याची वेळ आली. महाराष्ट्रातही मराठा,धनगर,मुस्लिमांना आरक्षण हवेच आहे.त्यांचे प्रश्न सुटलेले नाहीत.या पार्श्वभूमीवर या महत्त्वाच्या विषयाची चर्चा करण्याची आवश्यक्ता आहे.

## आरक्षणाचा इतिहास

मुळातआरक्षणाची कल्पना ही राष्ट्रपिता ज्योतिराव फुलेंची आहे.ही कल्पना त्यांनी प्रथम 1869 ला आणि नंतर 1882 ला इंग्रज सरकारपुढे मांडली होती.

"Implimentation of Riservation" अर्थात आरक्षणाची अंमलबजावणी भारतात आधुनिक काळात सर्वांत प्रथम राजर्षी छत्रपति शाहू महाराजांनी आपल्या करवीर अर्थात कोल्हापूर संस्थानात दि.26 जुलै 1802 पासून सुरु केली. Policy of Reservationअर्थात "आरक्षणाची" नीती किंव्हा धोरण.डॉ भिमराव आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातुन 26 जानेवारी 1950 पासून निश्चित केले.राष्ट्रपिता ज्योतिराव फुलेंच्या आरक्षण या कल्पनेला लागू करण्याचे काम त्यांचे पट्टशिष्य राजर्षी छत्रपति शाहू महाराजांनी केले.राजर्षी छत्रपति शाहू महाराजांनी दि.26 जुलै, 1802 रोजी सर्व ब्राह्मणेत्तरांसाठी 50 टक्के आरक्षणाची घोषणा आपल्या करवीर संस्थानात म्हणजेच कोल्हापूर संस्थानात केली.664संस्थानापैकीमूळनिवासी बहुजन समाजासोबत सामाजीक न्याय करणारी ३ संस्थाने होती. त्यामध्ये १)करवीर अर्थात कोल्हापूर,२)बडोदा आणि३)इंदौर..ही संस्थाने होती.राजर्षी छत्रपति शाहू

महाराजांनी जे 50 टक्के आरक्षण घोषित केले त्यातुन केवळ चारच जाती वगळल्या होत्या त्या १)ब्राह्मण,२)शेणवी,३)प्रभू,४)पारशी.या चार पुढारलेल्या जाती वगळून बाकी सर्व जातींना अर्थात,ब्राह्मणेत्तरांना म्हणजेच मूळनिवासी बहुजन समाजाला "आरक्षण" अर्थात प्रतिनिधित्व घोषित केले याला म्हणतात Implimentation of Reservation"म्हणजेच आरक्षणाची अंमलबजावणी.

राजर्षी छत्रपति शाहू महाराजांनी आरक्षण देण्यामागचे कारण म्हणजे या सबंधात महाराजांनी अगोदर पाहणी केली.या पाहणीत त्यांच्या लक्षात आले की,सरकारी दरबारी 71 पैकी 60 युरेशियन ब्राह्मण उच्च पदाच्या नोकरीवर होते व 11ब्राह्मणेत्तर होते.तसेच खाजगीत 52 पैकी 45 युरेशियन ब्राह्मण नोकरीत होते तर केवळ 7 ब्राह्मणेत्तर होते.हा प्रशासनातील असमतोल दूर करण्यासाठी राजर्षी छत्रपति शाहू महाराजांनी सर्व ब्राह्मणेत्तरांसाठी 50 टक्के आरक्षणाची घोषणा केली.त्यापूर्वी सर्व मोक्याच्या व माहत्वाच्या जागा माधव, बर्वे या चितपावन ब्राह्मणाने आपल्याच जातीतील लोकांना नोकऱ्या दिल्या होत्या.

राजर्षी छत्रपति शाहू महाराजांच्या या क्रांतिकारी निर्णयाला,बहुजन उद्धारक निर्णयाला खुप मोठया प्रमाणात विरोध करण्यात आला होता.खरे तर राजर्षी छत्रपति शाहू महाराज स्वतः राजे होतेव स्वतःच्या संस्थानात आरक्षण देणार होते.तरीही त्यांच्या या निर्णयाला उच्चवर्णियांकडुन विरोध झाला होता.

या मध्ये उदाहरण म्हणुन ॲड.गणपतराव अभ्यंकरांचे घेता येईल.ते सांगलीवरुन कोल्हापूर आले व राजर्षी छत्रपति शाहू महाराजांची भेट घेऊनजातवार स्कॉलरशिप व जातवार नोकऱ्या देण्याच्या निर्णयाला विरोध करु लागले.त्यांच्या मते लायकी पाहूनच स्कॉलरशिप व नोकऱ्या द्यायला पाहिजेत.त्यामागचे कारण म्हणजे त्यामुळे कोल्हापूर संस्थानातील युरेशियन ब्राह्मणांना नोकऱ्या मिळणार नव्हत्या,ते होऊ नये म्हणून सांगली संस्थानातील या व्यक्तीने छत्रपति शाहू महाराजांना असे आरक्षण देऊ नये असा सल्ला दिला.अशा प्रकारच्या विरोधाला न जुमानता राजर्षी छत्रपति शाहू महाराज आपल्या निर्णयावर ठाम राहीले.राजर्षी छत्रपति शाहू महाराज हेकर्ते सुधारक होते,नुसते बोलके सुधारक नव्हते हे त्यांच्या कृतीवरुन स्पष्ट होते.

## आरक्षणा बदलची भुमिका

राजकीय अथवा सामाजिक आरक्षणाला विरोध करताना किंवा समर्थन करताना आरक्षणाबाबतची डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची भूमिका समजून घेतली पाहिजे आणि त्याचबरोबर भारतीय समाजातील जात वास्तवही लक्षात घेतले पाहिजे. वर्णवर्चस्ववादाच्या पायावर उभ्या असलेल्या जातीय व्यवस्थेतून आरक्षण आले आहे, की आरक्षणातून जातीयवाद फोफावत आहे,याचेही नीट आकलन करून घेतले पाहिजे.

आरक्षणाबाबतही अनेक गैरसमज आहेत. त्यात अज्ञानाचा–अडाणीपणाचाही बराच भाग असतो. अर्थात त्यात आरक्षणाला विरोध करणारे आघाडीवर तर असतातच,परंतु समर्थन करणारेही पिछाडीवर नसतात. म्हणजे उदाहरणार्थ घटनेमध्ये फक्त दहा वर्षांसाठी आरक्षणाची तरतूद केली असताना साठ वर्षे झाली,तरी अजून ते चालूच आहे,अशी एक अडाणीपणाची म्हणा किंवा पूर्वग्रहदूषित मानसिकतेतून पुढे आलेली चर्चा सुरू असते.मुळात घटनेत दोन प्रकारचे आरक्षण आहे. एक म्हणजे अनुसूचित जाती,जमाती, भटके–विमुक्त,ओबीसी यांना शिक्षणातील प्रवेशासाठी व सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागांची तरतूद म्हणजे ते सामाजिक आरक्षण होय.पिढ्यानपिढया सामाजिक, आर्थिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासलेल्या समाजाला पुढारलेल्या समाजाच्या बरोबरीने आणण्यासाठी विशेष संधी म्हणून आरक्षणाची तरतूद करण्यात आली.या सामाजिक आरक्षणाला घटनेत कुठेही मर्यादा घालण्यात आलेली नाही.तरीही सरसकट दहा वर्षांसाठी देण्यात आलेले आरक्षण किती काळ पुढे चालू ठेवायचे,असे पुनःपुन्हा अज्ञान प्रकट करणारे प्रश्न उपस्थित केले जातात.

राज्यघटनेतील राजकीय आरक्षण हा दुसरा भाग आहे. त्याचे मूळ गोलमेज परिषद आणि गांधी–आंबेडकर राजकीय संघर्षापर्यंत शोधावे लागते.भारताच्या स्वातंत्र्याची चर्चा सुरू झाली,त्या वेळी या देशाचे राज्यकर्ते कोण असतील,या देशातील गरीब,दलित,दीनदुबळ्यांना सत्तेत सहभाग मिळणार की नाही, हा प्रश्न डॉ. आंबेडकरांना पडला होता. 1832 मध्ये लंडनमध्ये भरलेल्या गोलमेज परिषदेत त्यांनी स्वतंत्र भारतात सात कोटी अस्पृश्यांचे स्थान काय असणार,असा सवाल उपस्थित केला होता. त्याच ठिकाणी त्यांनी अस्पृश्यांना राजकीय हक्क मिळण्यासाठी स्वतंत्र मतदारसंघांची मागणी केली होती. त्याला गांधीजींनी प्राणांतिक उपोषणाने कडाडून विरोध केला.त्यातून गांधी विरुद्ध आंबेडकर असा संघर्ष उभा राहिला. अखेर तडजोडीचा भाग म्हणून आंबेडकरांना स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह सोडून द्यावा लागला आणि राखीव मतदारसंघावर समाधान मानावे लागले.पुणे करार म्हणून

त्याची नोंद इतिहासात झाली.स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत तीच संकल्पना पुढे चालू ठेवण्यात आली.म्हणजे लोकसभा व राज्याच्या विधानसभांमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव मतदारसंघ ठेवणे अशी तरतूद करण्यात आली.त्यालाच राजकीय आरक्षण म्हणतात.त्याला सुरुवातीला दहा वर्षांची मुदत ठेवण्यात आली होती;परंतु प्रस्थापित राजकीय पक्षांनी व राज्यकर्त्यांनी मागासवर्गीयांची मते मिळवण्यासाठी ही मुदत वेळोवेळी वाढवत नेली. राज्यसभा व विधान परिषदेत मात्र राजकीय आरक्षण नाही.पुढे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अनुसूचित जाती–जमातीबरोबरच ओबीसी व महिलांनाही राजकीय राखीव जागा ठेवण्यात आल्या. त्यामुळे राजकारणापासून दूर असलेला हा वर्ग मोठय़ा संख्येने थेट निर्णयप्रक्रियेत आला,ही राजकीय आरक्षणाची एक सकारात्मक बाजू असली तरी मूळ राजकीय आरक्षणाचा हेतू त्यामुळे साध्य झाला आहे असे म्हणता येत नाही.कारण आरक्षीत जाग्यावर देखील जे राजकीय क्षेत्रात प्रबळ आहेत ते मर्जीतील उमेदवार उभा करुन सत्ता व आधिकार स्वतः बळकावत असल्याचे दिसते..

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मुळ मागणी ही राखीव मतदारसंघापेक्षा स्वतंत्र मतदारसंघासाठी होती. याचे कारण स्वतंत्र मतदारसंघांमधून अस्पृश्यांचे प्रतिनिधी निवडून जाणार होते.राखीव मतदारसंघांतून प्रस्थापित पक्षाने उमेदवारी दिलेले दलित किंवा आदिवासी उमेदवार निवडून जाणार होते. डॉ.अंबेडकरांच्या मते ते समाजाचे नाही तर पक्षाचे प्रतिनिधित्व करतील अशी बाबासाहेबांची धारणा होती त्यामुळेच नंतर त्यांनी २१ जुलै 1846 रोजी पुणे करार रद्द करा अशी मागणी केली होती.

घटना समितीतील राजकीय राखीव जागांच्या संदर्भात झालेल्या चर्चेच्या वेळीही आंबेडकरांनी अस्पृश्यासाठी स्वतंत्र मतदारसंघाचा आग्रह धरला होता किंवा संयुक्त मतदारसंघ ठेवल्यास जो अस्पृश्य उमेदवार 40 टक्के अस्पृश्यांची मते मिळवेल,त्यालाच विजयी घोषित करावे, अशी त्यांनी सूचना मांडली होती.याचा अर्थ राखीव मतदारसंघ या संकल्पनेवर त्यांचा विश्वास नव्हता,म्हणजे ही संकल्पना दलित,आदिवासींना खऱ्या अर्थाने राजकीय अधिकार मिळवून देणारी नाही,त्यांचे खरेखुरे प्रतिनिधी कायदेमंडळात पाठविले जाणार नाहीत,तर प्रस्थापित पक्षांचे लोकच त्या जागा बळकावतील,अशी त्यांना भीती वाटत होती.ती खोटी ठरली नाही,हे आजच्या राजकीय वास्तवावरून स्पष्टपणे दिसत आहे.

पुढे तर 1855 मध्ये डॉ. आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शेडयुल्ड कास्ट फेडरेशनच्या कार्यकारिणीच्या बैठकीतच राजकीय राखीव जागा रद्द करा,असा ठरावच मंजूर करण्यात आला होता.आंबेडकरांना जातीपातीचे राजकारण करायचे नव्हते,तर जातीपाती तोडून भारतीय समाज एकजिनसी बनवायचा होता.म्हणून पुढे त्यांनी शेडयुल्ड कास्ट फेडरेशन बरखास्त करण्याची व सर्वसमावेशक अशा रिपब्लिकन पक्षाच्या स्थापनेची संकल्पना मांडली.भारतातील काँग्रेस,भाजप वा अन्य राजकीय पक्ष त्यांच्या पक्षातील दलित व आदिवासी उमेदवारांना राखीव मतदारसंघातून उमेदवारी देतात.त्यामुळे त्यांची समाजापेक्षा पक्षाशी बांधीलकी जास्त असते. ज्या पक्षांना सर्व समाजघटकांना राजकीय प्रवाहात आणायचे आहे,त्यांनी त्यांच्या पक्षात कुणाला किती प्रतिनिधित्व द्यायचे ते ठरवावे. त्यासाठी वेगळे राखीव मतदारसंघ ठेवण्याची आवश्यकता नाही.त्यानुसार राजकीय आरक्षण संपुष्टात आणले, तर त्यामुळे फारसा फरक पडणार नाही.

## सारांश

आरक्षणाच्या प्रश्नाने आज घडीला देशाचे वातावरण ढवळुन निघालेले आहे.विविध माध्यमात आज याबदलच चर्चा होताना दिसते,आज आरक्षण बचावचे नारे देखील दिले जात आहेत.परंतु या घडीला आरक्षण समाप्त करणे शक्य नाही आणि ते योग्य देखील होणार नाही.भारतात आरक्षणाची तरतुद ज्या सामाजीक,राजकीय व आर्थिक कारणाने करण्यात आलेली होती ते उदिष्ट साध्य झालेले नाही.उलट काही समाज घटकाना आरक्षणाची आवश्यक्ता असुनही त्याना डावलण्यात आलेले आहे, त्यामुळे त्यांच्यात अन्याय झााल्याची भावना आहे. त्या समाज घटकाना देखील विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याकरीता आरक्षण देण्याची आवश्यक्ता आहे.त्या बरोबरच आरक्षणाची मागणी मोठया प्रमाणात होत आहे त्याची कारणे देखील शोधण्याचा प्रयत्न होण्याची आवश्यक्ता आहे.महाराष्ट्राचे आज घडीला उदाहरण घेतले तर जी मराठा समाजाकडुन आरक्षणाची मागणी होत आहे त्यात चुकीचे असे काही नाही.आगोदर होता त्या पध्दतीने हा सर्व समाज शैक्षणीक व आर्थिक बाबतीत सक्षम नाही.तसेच इतर समाजाचे देखील आहे.धनगर समाज असेल किंवा मुस्लीम समाज असेल या सर्व बाबतीत

एक गोष्ट जानवते ती म्हणजे आर्थिक बाबतीत सक्षम नसणे होय,म्हणुन जे मुळ प्रश्न आहेत त्याची उत्तरे अगोदर शोधण्याची आवश्यक्ता आहे.

## संदर्भ :–


लोकराजा–राजर्षी छत्रपति शाहू महाराज
मराठा आरक्षण फायदे आणि प्रक्रिया,बाबासाहेब सराठे
आरक्षणाची वाटचाल आणि ओबीसी आरक्षण,डॉ.रवींद्र भणगे
दै.लोकसत्ता
http://www.inmarathi.com/